# सातारा नगरपरिषद, सातारा

१ केसरकर पेठ, सातारा. ४१५००१
फोन:-(०२१६२) २३४०७६/७७
फॅक्स :- (०२१६२) २३४०७६
ई-मेल :- sataramunicipal@rediffmail.com
municipal_str@dataone.in


जा.क्र.सानप/आरोग्य/2026/65

दिनांक :-05/03/2026

## "सातारा नगरपरिषद वातावरणीय कृती कक्ष दल"

### कार्यालयिन आदेश

वातावरणीय बदलाचे संकट २१ व्या शतकातील मानवजाती समोरील सर्वात मोठे आव्हान असून या शतकाअखेर पृथ्वीचे तापमान मर्यादित ठेवणे व त्याकरिता कार्बन उत्सर्जन नियंत्रीत करणे आवश्यक आहे. राज्याच्या सर्वांगीण व शाश्वत विकास धोरणाचा एक महत्वाचा भाग म्हणजे वातावरणीय अनुकूलन व वातावरणीय शमन धोरण. राष्ट्रीय वातावरणीय बदल कृती आराखडा, केंद्र सरकारच्या मिशन लाइफ व राज्य वातावरणीय कृती आराखडयाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्य वातावरणीय कृती कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र शासन, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाकडील शासन निर्णय क्रावकृ २०२४/प्र.क्र.२५/तांक.१ दि.२५ जुलै २०२४ अन्वये सातारा शहर वातावरणीय कृती कक्षाची स्थापना करण्यात येत आहे. सातारा शहर वातावरणीय कृती कक्षाची रचना खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम | नाव | कक्षामधील पद |
|---|---|---|---|
| १ | मुख्याधिकारी | श्री. विनोद जळक. | अध्यक्ष |
| २ | घनकचरा व्यवस्थापन,आरोग्य विभाग प्रमुख | श्री. राकेश गलीयल . | सदस्य |
| ३ | वाहतूक विभाग प्रमुख | श्री. प्रशांत निकम. | सदस्य |
| 4 | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग प्रमुख | श्री. शहाजी वाठारे. | सदस्य |
| ५ | नगर अभियंता बांधकाम विभाग प्रमुख | श्री.विनोद दहिफळे.<br>श्री. दिलीप चिद्रे. | सदस्य |
| ६ | शहर नियोजक (Town planner) विभाग प्रमुख | श्री. तुषार मदने. | सदस्य |
| ७ | वृक्ष विभाग प्रमुख | श्री. दिग्विजय गाढवे. | सदस्य |
| ८ | शिक्षण विभाग अधिकारी | सौ. अनिल माने. | सदस्य |
| ९ | स्वयंसेवी संस्था सातारा. | श्री.विजयकुमार निंबाळकर | सदस्य |
| १० | AIILSG, मुंबई (NGO) - प्रतिनिधी सातारा | श्री. मनिष करपे. | सदस्य |
| ११ | CWAS संस्था (NGO) - प्रतिनिधी सातारा | सौ.जीनल छेडा | सदस्य |
| १२ | अग्निशामक विभाग पर्यवेक्षक सातारा | श्री. अमित निकम. | सदस्य |
| १३ | शहर समन्वयक, स्वच्छ भारत अभियान | श्री. नितीन माळवे. | सिटी मॉनिटरिंग |

**कार्यकक्षा:**

- संबंधित शहराचा वातावरणीय कृती आराखडा तयार कारणे. शहराचा वातावरणीय कृती आराखडा राज्याच्या वातावरणीय कृती आराखड्यासोबत (SAPCC) संरेखित असावा, तसेच वातावरणीय बदलामुळे संबंधित शहरात उदभवणाऱ्या विशिष्ट आव्हानांचा व त्यांचे निराकरण करण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा त्यात समावेश असावा.
- शहर वातावरणीय कृती आराखड्याची अंमलबजावणी करणे.
- राज्य वातावरणीय कृती आराखड्याची शहरात अंमलबजावणी करणे.
- महाराष्ट्रातील शहरांसाठी बनविलेल्या डि-कार्बनायजेशन रोडमॅपची अंमलबजावणी करणे.
- माझी वसुंधरा अभियानाची शहरात अंमलबजावणी करणे.
- मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स ने निर्देशित केलेल्या कामांची अंमलबजावणी करणे.
- हरित महाराष्ट्र कार्यक्रम शहरात राबविणे.
- शहर पातळीवर वातावरणीय कृतीचे केंद्रक (nucleus) म्हणून काम करणे.
- संबंधित तांत्रिक संस्था/अशासकीय संस्था/ संशोधन संस्था इत्यादींसोबत ज्ञान व्यवस्थापन (knowledge management), माहितीचा प्रसार, सहयोग आणि नेटवर्किंग करणे.
- विभागीय तसेच राज्य वातावरणीय कृती कक्षाच्या निर्देशानुसार इतर जबाबदाऱ्या पार पाडणे.

मुख्याधिकारी,
सातारा नगरपरिषद, सातारा